

## बुध कौशिक ऋषी विरचित

# रामरक्षा

## मराठी समश्लोकी

## श्याम कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# बुध कौशिक ऋषी विरचित

# -रामरक्षा स्तोत्र-

## मराठी काव्यमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी





बुध कौशिक ऋषी विरचित

# -रामरक्षा-

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वारा श्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार''फ़्लॅट क्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे ४११०२९
संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act १९५७. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.





प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १० एप्रिल २०२२ (रामनवमी शके १९४४)

©esahity Pratishthan®२०२२

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.





# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित





# बुध कौशिक ऋषी विरचित

# -रामरक्षा स्तोत्र-

## मराठी काव्यमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी





# अथ श्रीरामरक्षा स्तोत्रं

श्रीगणेशाय नम:॥

***अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य ।बुधकौशिक ऋषि:।***

***श्रीसीतारामचंद्रो देवता । अनुष्टुप् छंद: ।***

या श्रीरामरक्षास्तोत्रमंत्राचा।ऋषि बुधकौशिक ।देवता श्रीसीतारामचंद्र ।छंद अनुष्टुभ ।

***सीता शक्ति:।श्रीमद्धनुमान कीलकम् ।***

***श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे रामरक्षास्तोत्रजपे विनियोग: ॥***

सीता शक्ती असे मेख श्रीमद् हनुमान होतसे ।

रामा तोषविण्या स्तोत्र जपे हा विनियोगची ॥





॥ अथ ध्यानम् ॥

***ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं ।***
***पीतं वासोवसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नं ॥***
***वामाङ्कारूढ्सीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं ।***
***नानाऽलङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं रामचंद्रम ॥***

स्मरणें आजानुबाहू धरि शर धनुषा घालि पद्मासनास
धारी पीतांबरास नवकमलदला स्पर्धिती नेत्र ज्याचे
सीता वामांकि बैसे मुखकमलि तिच्या सावळया दृष्टि ठेवी
शोभे आभूषणांनी शिरि असति जटा दीर्घ ज्या रामचंद्रा ॥

॥इति ध्यानम ॥





***चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् ।***
***एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥१॥***

चरित्र रघुनाथाचे शतकोटीत विस्तृत
एकेक अक्षर त्याचे महापातक नाशते ॥१॥

***ध्यात्त्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनं।***
***जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंडितम्॥२॥***

रामा नीलोत्पलाश्यामा स्मरता पद्मलोचना
जानकीलक्ष्मणासंगे जटामुकुट शोभित ॥२॥





***सासी तूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरान्तकम् ।***
***स्वलीलया जगत्रातुमाविर्भूतमजं विभुम् ॥३॥***

चाप भात्यासवे हाती बाण नाशी निशाचरा
रक्षण्या जग लीलेने देव तेजस्वि ये जणू ॥३॥

***रामरक्षां पठेत् प्राज्ञ: पापघ्नीं सर्वकामदाम् ।***
***’शिरो’मे राघव: पातु, ’भालं’ दशरथात्मज: ॥४॥***

रामरक्षा जपे प्राज्ञ  पापघ्नी सर्वकामदा
मस्तका राघव रक्षो कपाळा दशरथात्मज ॥४॥





***कौसल्येयो ’दृशौ’पातु विश्वामित्रप्रिय:’श्रुती ’***
***घ्राणं’ पातु मखत्राता ’मुखं’सौमितिवत्सल: ॥५॥***

कौसल्येय जपो दृष्टी काना विश्वामित्रप्रिय
नाक रक्षो मखत्राता मुखा सौमित्रिवत्सल ॥५॥

***’जिव्हां’ विद्यानिधि: पातु ’कंठं’भरतवन्दित:***
***’स्कंधौ’ दिव्यायुध: पातु,’भुजौ’ भग्नेशकार्मुक:॥६॥***

जीभ विद्यानिधी रक्षो कंठा भरतवंदित
दिव्यायुध रक्षो खांद्या भुजां भग्नेशकार्मुक ॥६॥





***'करौ' सीतापतिः पातु 'हृदयं' जामदग्न्यजित ।***

***'मध्यं'पातु खरध्वंसी 'नाभिं'जांबवदाश्रयः॥७॥***

हातां सीतापती रक्षो हृदया जामदग्न्यजित

देहमध्या खरध्वंसी नाभी जांबवदाश्रय ॥७॥

***सुग्रीवेशः 'कटी'पातु 'सक्थिनी' हनुमत्प्रभुः***

***'उरू'रघुत्तमः पातु,रक्षः कुलविनाशकृत ॥८॥***

सुग्रीवेश कटी रक्षो नितंबा हनुमत्प्रभू

रघुत्तम रक्षो मांड्या राक्षसकुलअंतक ॥८॥





***’जानुनी ’सेतुकृत्पातु, ’जङ्घे ’दशमुखान्तकः***

***’पादौ ’बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः॥९॥***

सेतुकृत गुडघ्यां रक्षो जांघा दशमुखान्तक

पायां बिभीषणश्रीद रक्षो सर्वांग राम तो ॥९॥

***एतां रामबलोपेतां रक्षां यां सुकृती पठेत्।***

***सः चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत्॥१०॥***

रामाचे बल देणारे स्तोत्र सुकृति पाठक

होईल पुत्री विजयी चिरायु विनयी सुखी ॥१०॥





***पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः***

***न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः॥११॥***

पाताळ भूमि आकाशी भ्रमती छद्मरूपि जे

पाहू देखिल शकती ना रक्षिते रामनाम ज्यां ॥११॥

***रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन्।***

***नरो न लिप्यते पापैः भुक्तिं मुक्तिं च विन्दति ॥१२॥***

रामास रामभद्रास स्मरे वा रामचन्द्र जो ।

स्पर्शते पाप ना त्याला मुक्ती सौख्य जगी मिळे ॥१२॥





***जगज्जैत्रेक मन्त्रेण रामनाम्नाऽभिरक्षितम् ।***

***यः कण्ठे धारयेतस्य करस्थाः सर्व सिद्धयः ॥१३॥***

जग ज्या एक मन्त्राने रक्षिले, रामनाम ते

कण्ठी ज्याच्या वसे त्याच्या हाती सिद्धीच सर्वही ॥१३॥

***वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत् ।***

***अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम्॥१४॥***

पिंजरा जणु वज्राचा जो रामकवचा स्मरे ।

न लागे त्यास आघात सदा हो जयमंगल ॥१४॥





***आदिष्टवान्यथा स्वप्ने रामरक्षाम्मिमां हर: ।***
***तथा लिखितवान्प्रात: प्रबुद्धो बुधकौशिक: ॥१५॥***

शिवाने रामरक्षेस स्वप्नात उपदेशिले ।
साक्षात्कारि लिही तैसे सकाळी बुधकौशिक ॥१५॥

***आराम: कल्पवृक्षाणां विराम: सकलापदाम्‌ ।***
***अभिरामस्त्रिलोकानां राम: श्रीमान्स न: प्रभु: ॥१६॥***

आराम कल्पवृक्षाचा संपवी सर्व आपदा ।
अभिराम तिन्ही लोकां श्रीराम प्रभु आमचा ॥१६॥





***तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ।***
***पुन्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ ॥१७॥***

सुकुमार युवा दोघे रूपवान महाबली
विशाल नेत्रकमल कृष्णवल्कलधारि जे ॥१७॥

***फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।***
***पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥१८॥***

खाती कन्दमुळा स्वस्थ तापसी ब्रह्मचारि ते ।
दशरथा पुत्र ते दोघे बन्धु राम नि लक्ष्मण ॥१८॥





***शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्व धनुष्मतां ।***

***रक्ष: कुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ॥१९॥***

जनांना सर्व आधार धनुर्धाऱ्यात श्रेष्ठ जे ।

रघू दोन आम्हा रक्षो  ते दानव कुलान्तक ॥१९॥

***आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसङ्गिनौ ।***

***रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रत:पथि सदैव गच्छताम् ॥२०॥***

सज्ज धनुष्या अक्षय्य भात्यातील बाणास लावुनी हात

रक्षणार्थ रामलक्ष्मण सदैव माझ्यापुढे पथी असोत ॥२०॥





***संन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा ।***

***गच्छन्मनोरथोऽस्माकं राम:पातु सलक्ष्मण:॥२१॥***

शस्त्रसज्ज सवे खड्ग धनुर्बाण मनोरथी ।

लक्ष्मणासह जो राम आमच्या रक्षणा करी ॥२१॥

***रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली।***

***काकुत्स्थ:पुरुष:पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥२२॥***

राम दाशरथी शूर मागे लक्ष्मण ज्यासवे ।

कौसल्यापुत्र काकुत्स्थ पुरुष पूर्ण रघूत्तम ॥२२॥





***वेदान्त वेद्यो यज्ञेश: पुराणपुरुषोत्तम ।***
***जानकीवल्लभ: श्रीमान अप्रमेय पराक्रम:॥२३॥***

ज्ञात वेदान्ति यज्ञेश पुराणपुरुषोत्तम ।
श्रीमान जानकीनाथ जो अतुल्य पराक्रमी ॥२३॥

***इत्येतानि जपन्नित्यं मद्भक्त: श्रद्धयान्वित:।***
***अश्वमेधाधिकं पुण्यं सम्प्राप्नोति न संशय:॥२४॥***

याप्रकारे जपे नित्य श्रद्धेने मम भक्त जो ।
अश्वमेधाहुनी पुण्य नि:संशयच त्या मिळे ॥२४॥





***रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीत वाससम् ।***

***स्तुवन्ति नामभिर्दिव्यैः न ते संसारिणो नरः॥२५॥***

दूर्वादलापरी श्याम वर्ण धारी पीतांबर

कमलापरि नीलाक्ष अश्या रामा स्तवीति जे ।

घेउनी दिव्य ते नाम नर या जगतातले

संसारी असुनी होती मोक्षलाभास पात्र ते ॥२५॥





***रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुन्दरं***
***काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकं***
***राजेन्द्रं सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शान्त मूर्तिं***
***वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥२६॥***

रामा लक्ष्मणअग्रजा रघुवरा सीतापती सुंदरा
काकुस्था करुणार्णवा गुणनिधी विप्रप्रिया धार्मिका
राजेन्द्रा सत्यशीला दशरथतनया श्यामला शान्तमूर्ती
वन्दे लोकाभिरामा रघुकुलतिलका राघवा रावणारि ॥२६॥





***रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे ।***

***रघुनाथाय नाथाय सीताया: पतये नम:॥२७॥***

रामास रामभद्रास रामचंद्रास ब्रह्म जो ।

रघुनाथास नाथास सीतापतिप्रती नमो ॥२७॥





***श्रीराम राम रघुनन्दन राम राम***
***श्रीराम राम भरताग्रज राम राम***
***श्रीराम राम रणकर्कश राम राम***
***श्रीराम राम शरणं भव राम राम ॥२८॥***

श्रीराम राम रघुनन्दन राम राम
श्रीराम राम भरताग्रज राम राम
श्रीराम राम रणकर्कश राम राम
श्रीराम राम मम आश्रय होइ राम ॥२८॥





***श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि ।***

***श्रीरामचंद्रचरणौ वचसागृणामि***

***श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि***

***श्रीरामचंद्रचरणौ शरण प्रपद्ये ॥२९॥***

श्रीरामचंद्रचरणा स्मरतो मनी मी

श्रीरामचंद्रचरणा स्तवि वाणिने मी

श्रीरामचंद्रचरणा लवतो शिरे मी

श्रीरामचंद्रचरणा शरणागता मी ॥२९॥





***माता रामो मत्पिता रामचंद्र:***

***स्वामी रामो मत्सखा रामचंद्र***

***सर्वस्वं मे रामचंद्रो दयालु:***

***नान्यं जाने नैव जाने न जाने ॥३०॥***

माता तैसा मत्पिता रामचंद्र

स्वामी आणि मित्रही रामचंद्र

सर्वस्व मला दयाळू रामचंद्र

जाणीतो मी आणखी ना कुणास ॥३०॥





*दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।*

*पुरतो मारुतिर्यस्य तं वंदे रघुनंदनम् ॥३१॥*

डावीकडे जया सीता भ्राता लक्ष्मण दक्षिणी ।

पुढे मारुतिही ज्याच्या त्या रामा मम वन्दन ॥३१॥





***लोकाभिरामं रणरंगधीरम् ।***

***राजीव नेत्रं रघुवंशनाथं ।***

***कारुण्यरूपं करुणाकरं तं ।***

***श्रीरामचंद्रं शरणं प्रपद्ये ॥३२॥***

लोकाभिरामा रणरंगधीरा ।

राजीव नेत्रा रघुवंशनाथा

कारुण्यरूपा करुणाकरा त्या ।

श्रीरामचंद्रा शरणार्थि मीच ॥३२॥





***मनोजवं मारुततुल्यवेगम् ।***
***जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।***
***वातात्मजं वानरयूथमुख्यम् ।***
***श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥३३॥***

मनापरी मारुतवेग ज्याचा ।
जितेन्द्रिया बुद्धिमतात श्रेष्ठा
वातात्मजा वानरयूथ मुख्या
श्रीरामदूता शरणार्थि मीच ॥३३॥





***कूजन्तं राम रामेति मधुरं मधुराक्षरं ।***

***आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥३४॥***

राम राम करी ऐशा कूजना मधु अक्षरी ।

बैसे कविता शाखीं त्या वन्दे वाल्मीकिकोकिला ॥३४॥

***आपदां अपहर्तारं दातारं सर्वसंपदां ।***

***लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥३५॥***

आपदांना निवारीत सर्व संपत्ति देई जो ।

लोकाभिरामा श्रीरामा नमतो त्या पुन्हा पुन्हा ॥३५॥





***भर्जनं भवबीजानां अर्जनं सुखसम्पदाम् ।***

***तर्जनं यमदूतानां राम रामेति गर्जनं ॥३६॥***

भाजुनी भवबीजांना मिळवी सुखसम्पदा ।

पळवी यमदूतांना राम राम हि गर्जना ॥३७॥





***रामो राजमणि: सदा विजयते रामं रमेशं भजे***
***रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नम:***
***रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहं***
***रामे चित्तलय:सदा भवतु मे भो राम माम् उद्धर ॥३८॥***

राजांचा मणि नित्य राम विजयी रामा रमेशा भजा
रामाने वधिली निशाचरचमू रामास त्या वंदन
रामाहून न श्रेष्ठ स्थान दुसरे त्याचाच मी दास हो
माझे चित्त सदैव रामि वसु दे  रामा मला उद्धर ॥३८॥





***राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे***

***सहस्रनाम तत्तुल्यं राम नाम वरानने ॥३८॥***

राम राम जपामध्ये रमतो मी मनोरम

सहस्र अन्य नामाच्या तुल्य नाम वरानन ॥३८॥

**॥इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षासोत्रं सम्पूर्णम॥**




**॥श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु॥**

श्रीबुधकौशिकां




श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची, मेघदूत, तीन धमाल विनोदी आणि एक स्त्रीमनाचा वेध घेणारा गंभीर कथासंग्रह अशी पाच पुस्तकं. यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा. (इंटरनेट पाहिजे हो. नाहीतर उघडणार नाही)















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## श्याम कुलकर्णी यांचे हे सहावे पुस्तक.

प्रा. श्री. श्याम कुलकर्णी हे जुन्या काळातले इंजिनियरिंग प्राध्यापक. प्राध्यापकी पेशा आणि अभियांत्रिकी शिक्षण असले तरी पिंड साहित्य निर्मिकाचा. त्यामुळे वाचन व लेखन भरपूर केले. पण प्रसिद्धीला दिले नाही. योगायोगाने गाठ पडली ई साहित्य प्रतिष्ठानशी आणि त्यांनी स्वांतःसुखाय लिहून ठेवलेला खजिना ई साहित्यच्या वाचकांच्या सुखभेटीला येत आहे. त्यांनी जसे विनोदी अंगाचे खुसखुशित लेखन केले तसेच गंभीर विचारगर्भ कथालेखनही. प्रवासवर्णनासोबतच संस्कृत काव्याचा काव्यमय रसाळ अनुवादही त्यांनी केला आहे. एकाच व्यक्तीच्या अंगी अशा नाना कळा आणि त्याही उच्च दर्जाच्या सहसा आढळून येत नाहीत.





प्रा. श्री. श्याम कुलकर्णी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३७), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ.





वृषाली जोशी(३४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२१), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(८), श्याम कुलकर्णी(६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(१२) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात





ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

